# अर्ज

**विषय - स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापण करिता कच-यावर प्रक्रिया करण्या करीता Material Recovery Facility (MRF) संस्थेची नेमणूकीबाबत..**

| अ. क्र | तपशील | आहे / नाही |
|---|---|---|
| १ | संस्था / कंपनी नाव | |
| २ | संपूर्ण पता - | |
| ३ | संपर्क क्रमांक (कार्यालय व मोबाईल क्र) | |
| ४ | शासनाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ नुसार नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act Licence) **आहे / नाही** | |
| ५ | पॅनकार्ड / उदयम आधार कार्ड प्रत. **आहे / नाही** | |
| ६ | २ वर्षे आयकर रिटर्न पुरावा तसेच GST प्रमाणपत्र छायांकित प्रत. **आहे / नाही** | |
| ७ | संस्था किंवा कंपनी आर्थिक क्षमता प्रमाणपत्र - कंपनीचे मागील दोन वर्षाचे आर्थिक वर्षाचे किमान १ कोटी पेक्षा जास्त उलाढाल (CA प्रमाणपत्र) किंवा बँक गॅरंटी प्रमाणपत्र. **आहे / नाही** | |
| ८ | प्लास्टिक पुर्नचक्रीकरणाशी संलग्न कामे किमान 3 वर्षे केले असल्याचा अनुभव प्रमाणपत्र. **आहे / नाही** | |
| ९ | प्रस्ताव सादर करणारी संस्था किंवा कंपनी ही अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया (Recycler) असल्याचे MPCB कडील प्रमाणपत्र किंवा प्रस्तावित संस्था किंवा कंपनी यांचे MPCB ने मान्यता दिलेल्या किमान ३ प्लास्टिक पुर्नप्रक्रिया (Recycler) कंपनीसोबत असलेले कराराची प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल. **आहे / नाही** | |
| १० | प्रकल्प चालविण्या करीता एकूण प्रकल्प रकमेच्या ३ टक्के रक्कम अनामत रक्कम ही जमा करावी. **आहे / नाही** | |

**विषय - स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापण करिता कच-यावर प्रक्रिया करण्या करीता Material Recovery Facility (MRF) संस्थेची नेमणूकीकरीता वृत्तपत्रात जाहिरात देनेबाबत.**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा -२ जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित ठेवण्यासाठी व जिल्ह्यातील १५७९ गावातून कचरा संकलन करून सदर कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी Material Recovery Facility (MRF) संस्थेची नेमणूक होणे कामी इच्छुक व पात्र संस्था / कंपनीकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. संस्था/कंपनी निवड होण्यासाठी संस्था / कंपनी अर्हता / पात्रता किंवा प्रस्तावासोबत अत्यावश्यक कागदपत्र खालील प्रमाणे-

१) शासनाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ नुसार नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act Licence)
२) पॅनकार्ड / उदयम आधार कार्ड प्रत.
३) २ वर्षे आयकर रिटर्न पुरावा तसेच GST प्रमाणपत्र छायांकित प्रत.
४) संस्था किंवा कंपनी आर्थिक क्षमता प्रमाणपत्र - कंपनीचे मागील दोन वर्षांचे आर्थिक वर्षाचे किमान १ कोटी पेक्षा जास्त उलाढाल (CA प्रमाणपत्र) किंवा बँक गॅरंटी प्रमाणपत्र.
५) प्लास्टिक पुर्नचक्रीकरणाशी संलग्न कामे किमान 3 वर्षे केले असल्याचा अनुभव प्रमाणपत्र.
६) प्रस्ताव सादर करणारी संस्था किंवा कंपनी ही अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया (Recycler) असल्याचे MPCB कडील प्रमाणपत्र किंवा प्रस्तावित संस्था किंवा कंपनी यांचे MPCB ने मान्यता दिलेल्या किमान ३ प्लास्टिक पुर्नप्रक्रिया (Recycler) कंपनीसोबत असलेले कराराची प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल.
७) सदर प्रकल्प ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यात यावे. तथापि, भविष्यात स्वयंसेवी संस्थांचे दायित्व निर्माण झाल्यास संबंधित संस्थेकडून देय राहील.
८) प्रकल्प चालविण्या करीता एकूण प्रकल्प रकमेच्या ३ टक्के रक्कम अनामत रक्कम ही जमा करावी.

**कामाचे स्वरूप (Scope Of Work)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष प्रकल्प चालविणे, सर्व प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती, तालुक्यातील प्रत्येक गावातून ( जिल्ह्यातील एकूण १५७९ गावांमधून ) ग्रामपंचायतींना कोणताही मोबदला न देता सुका कचरा संकलित करणे, गोळा झालेले प्लास्टिक वेस्ट वर उपरोक्त मशीनद्वारे प्रक्रिया करून प्रक्रिया केलेले ( स्वच्छ करणे, तुकडे करणे व बंडल तयार करणे इत्यादी ) प्लास्टिक MPCB कडून मान्यता प्राप्त पुर्नचक्रीकरण संस्था कडे वर्ग करणे यासाठी मटेरियल रिसायकलिंग सुविधा किंवा साहित्य पुनर्प्राप्ती सुविधा किंवा मल्टी रि-यूज सुविधा ( MRF-Material Recovery Facility ) म्हणून काम करणे व याबाबत गावनिहाय गोळा केलेल्या कचऱ्याचे वजन किलोग्रॅम सह तसेच प्लास्टिक व्यवस्थापन कक्षात प्रक्रिया केलेले प्लास्टिक कचरा पुर्नचक्रीकरण संस्था किंवा कंपनीकडे वर्ग केलेले वजन किलोसह मासिक अहवाल संबंधित गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना देणे.

**अटी व शर्ती**

१) प्रस्ताव सादर करणारी संस्था किंवा कंपनी ही अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया ( Recycler ) असल्याचे MPCB कडील प्रमाणपत्र असणे अनिवार्य असेल. किंवा प्रस्तावित ( MRF-Material Recovery Facility ) संस्था/कंपनी यांचे MPCB ने मान्यता दिलेल्या किमान ३ अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया ( Recycler ) कंपनीसोबत असलेले कराराची प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल.
२) निवड केलेल्या संस्था किंवा कंपनीसोबत जिल्हा परिषद मार्फत उपरोक्त कामासाठी ३ वर्षाच्या कालावधीसाठी करार करण्यात येईल सदर काम समाधानकारक असल्यास पुढील २ वर्षाचा कालावधी वाढविण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे राहील. सदर

कालावधी समाप्त झाले नंतर तालुका प्लास्टिक व्यवस्थापन युनिट वर कोणताही हक्क संस्था किंवा कंपनीचा नसेल.

३) निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी प्रत्येक तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष याची वरील कालावधीसाठी नियमित देखभाल दुरुस्ती, आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरवणे व त्यांना मजुरी प्रदान करणे, सदर प्रकल्पाचे वीज व पाणी बिल अदा करणे इत्यादी साठीचा लागणारा खर्च स्वतः करणे बंधनकारक असेल.

४) प्रत्येक तालुक्यातील गावांचा प्लास्टिक कचरावर प्रक्रिया करणेकामी **तालुकास्तरीय मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी केंद्र / प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट युनिटचे शेड, प्लास्टिक श्रेडर मशीन, प्लास्टिक बेलिंग मशीन व डस्ट रिमुवर मशीन आणि या व्यतिरिक्त प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्षा करिता लागणारे शेड, संरक्षक भिंत, कचरा वाहनासाठी प्लॅटफॉर्म, नळ कनेक्शन व वीज सुविधा इत्यादी सुविधा असलेले तालुका प्लास्टिक युनिट केंद्र / स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा - २ पाणी व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.** सदर युनिट / केंद्र चालवण्यासाठी नेमणूक केलेल्या Material Recovery Facility संस्थेकडून जिल्हा परिषद **अहिल्यानगर** किंवा शासनामार्फत कोणतेही भाडे आकारण्यात येणार नाही. मात्र उपरोक्त मशीन व शेड दीर्घ कालावधीसाठी कार्यन्वित राहणे करिता नेमणूक केलेल्या संस्था / कंपनी यांना तालुका प्लास्टिक व्यवस्थापन युनिटमधील वरील सर्व घटकांची नियमित देखभाल दुरुस्ती करणे अनिवार्य असेल याबाबतचे हमीपत्र देणे संस्था किंवा कंपनी यांना बंधनकारक असेल.

५) निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीमधील कचरा संकलन केंद्र येथून संकलित कच-याची वाहतूक स्वखर्चाने करावयाची आहे. त्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे द्वारे कोणताही खर्च अथवा साधनसामुग्री उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

६) निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी तालुका निहाय व ग्रामपंचायत निहाय प्लास्टिक कचरा संकलनाचे नियोजन करून प्रत्येक गावांची नियमित सुका कचरा संकलित करणे बंधनकारक असेल. यासाठी गाव निहाय कचरा संकलनासाठी वाहन फिरतीचा रूट प्लान तालुका व जिल्हा स्तरावर सादर करणे बंधनकारक असेल.

७) गाव व ग्रामपंचायत तसेच तालुका निहाय गोळा केलेल्या कचऱ्याचे वजन किलो सह तसेच कक्षात प्रक्रिया केलेले प्लास्टिक कचरा पुर्नचक्रीकरण संस्था किंवा कंपनीकडे वर्ग केलेले वजन किलोसह मासिक अहवाल संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना देणे बंधनकारक असेल.

८) निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीमधील कचरा संकलन करून ते बंद किंवा अवारण असलेल्या तसेच आतमध्ये कचरा वर्गीकरणासाठी कप्पे असलेल्या वाहनातूनच वहन करणे बंधनकारक असेल.

९) तालुक्यातील संबंधित ग्रामपंचायत कडून कोणताही आर्थिक मोबदला न देता सुका कचरा गोळा करून तालुकास्तरावरील प्लास्टिक व्यवस्थापन कक्षा पर्यंत सदर कचरा संकलन संकलित करण्याची जबाबदारी MRF संस्थेची किंवा कंपनीची असेल मात्र ग्रामपंचायत हद्दीमधील इतर भंगारवाले, दुकानदार किंवा

कुटुंबे त्यांचेकडील कचरा विकत देत असल्यास त्यांना त्याची आवश्यक देय रक्कम अदा करून सदर कचरा ही विकत घेण्याची मुभा निवड केलेल्या संस्था किंवा कंपनीस असेल. व सदर कचराही तालुकास्तरावरील प्लास्टिक वेस्ट कक्षात पुढील कार्यवाहीसाठी संकलित करून त्यापासून मिळणारे आर्थिक उत्पन्न संस्थेची किंवा कंपनीचे असेल त्यावर जिल्हा परिषदेचा कोणताही हक्क नसेल.

१०) कामगार कायदा अंतर्गत तालुकास्तरीय प्लास्टिक व्यवस्थापन युनिट वर कार्यरत किंवा नेमणूक केलेले मजूर किंवा कर्मचारी यांना किमान वेतन २४ फेब्रुवारी २०१५ चे अधिसूचने / कायदा प्रमाणे देय राहील सदर मजूर किंवा कर्मचारी यांना दिला जाणारा मोबदला किंवा पगार त्यांची बँक खात्यामध्ये देणे बंधनकारक राहील. तसेच सर्व कामगारांचे PF जमा करणे व ESIC अंतर्गत विमा उतरविण्याची जबाबदारी संबंधित प्रस्तावित संस्थेची असेल. याबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्यास जिल्हा परिषद अहिल्यानगर जबाबदार राहणार नाही.

११) बालमजूर कायद्याची पालन करणे संस्थेस किंवा कंपनीस बंधनकारक राहील.

१२) दैनंदिन काम करतेवेळी ( कोणतीही काम ) इजा, अपघात अथवा मृत्यू संभवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे अपघात झाल्यास त्याची भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी निवड केलेले संस्था किंवा कंपनीची राहील यांची राहील.

१३) संस्थेची किंवा कंपनीचे निवड झाल्यानंतर सदर संस्था / कंपनीने करारनामा विहित रकमेच्या मुद्रांक पेपरवर पाणी व स्वच्छता विभाग अहमदनगर यांनी दिलेल्या विहित नमुन्यात त्वरित भरून द्यावा लागेल त्याबाबतचा खर्च संस्था किंवा कंपनी यांना करावा लागेल. सदर करारनामा झाले नंतर कार्यदेश देण्यात येईल.

१४) एनवेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी वेळोवेळी सुचविले जाणारे कामातील बदल किंवा वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय आदेश, परिपत्रक काटेकोरपणे अनुपालन करणे संस्था / कंपनी यांच्यावर बंधनकारक राहतील.

१५) कोणतीही अटी शर्ती असलेला प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही.

१६) निवड करण्यात आलेल्या संस्था / कंपनीच्या देत असलेल्या सेवा बाबत तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायतचे तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा नेमून दिलेले कामकाज समाधान कारक नसल्यास संस्थेची नियुक्त रद्द करणे बाबतचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी राखून ठेवलेली आहेत.

१७) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असलेले बाबत रुपये ५०० च्या स्टॅम्प पेपर प्रस्तावासोबत देणे अनिवार्य असेल (वरील सर्व अटी शर्ती नमूद करण्यात यावे.

१८) इच्छुक असलेल्या संस्था / कंपनीकडून प्राप्त प्रस्ताव पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी राखून ठेवलेले आहेत.

जाहिरात नमुना पुढीलप्रमाणे-

**तालुका प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिट (PWMU) चालविणे ( MRF-Material Recovery Facility ) साठी नेमणूक**

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा - २, जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत १४ तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित ठेवणेसाठी व जिल्हयातील १५७९ गावांतून कचरा संकलन करून सदर कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी **MRF** संस्थेची किमान ३ वर्ष कालावधीसाठी नेमणूक होणे कामी इच्छुक व पात्र संस्था / कंपनीकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. संस्था / कंपनी निवड होण्यासाठी कामकाजासंबंधी माहिती व संस्था/कंपनी अर्हता व पात्रता किंवा प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्र, नेमणूक बाबतचे अटी शर्ती https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेले आहेत. सदर अटी व शर्तीसह आवश्यक सर्व कागदपत्रासह प्रस्ताव दिनांक -१४/०३/२०२५ रोजी संध्या. ४.०० वाजेपर्यंत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे जमा करण्यात यावा.

**प्रकल्प संचालक ,**
**जल जीवन मिशन,**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रकल्प संचालक ,**
**जल जीवन मिशन,**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**